बीड । गुरुवार
२६.०६.२०२५
वर्षे : ५ अंक : ८६
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# ग्रामीण पाणी पुरवठ्याचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे एसीबीच्या जाळ्यात



## ८० हजार रुपयाची लाच घेताना रंगेहात अटक ! लिपिक किरण कुमार यांचेही दिवस भरले !

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यामध्ये लाचखोरीच्या घटना मोठ्या प्रमाणात सुरू आहेत. गेल्या काही महिन्यापासून ज्या ज्या अधिकाऱ्यांवर कर्मचाऱ्यांवर कारवाया झाल्या आहेत, यावरून जिल्ह्यामध्ये कशाप्रकारे अधिकारी भ्रष्टकारभार सुरु आहे हे लक्षात येते. बीड जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणीपुरवठ्याचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे व वरिष्ठ लिपिक किरण कुमार हावळे या दोघांना ८० हजाराची लाच घेताना एसीबीने रंगहात पकडले, विशेष म्हणजे हेच कार्यकारी अभियंता जल जीवन मध्ये बिले काढण्यासाठी तीन ते चार टक्क्याने पैसे घेत असल्याची चर्चा ठेकेदारामध्ये होत आहे. यामुळे या लाचखोर अधिकाऱ्याची संपूर्ण संपत्तीची चौकशी व्हावी अशी ही मागणी आता होत आहे.

ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे यांच्यावर मोठी कारवाई करण्यात आली आहे. एसीबीने मुकुंद आंधळे व लिपिक किरण हावळे या दोघांना तक्रारदाराकडून बिले काढण्यासाठी ८० हजार रुपयांची लाच मागितली होती. लाच देण्याची इच्छा नसल्याने तक्रारदाराने एसीबी कडे तक्रार केल्याने मुकुंद आंधळे यांनी लाज ▶▶ उर्वरित पान २ वर

# विशेष प्रदर्शनाच्या माध्यमातून लोकशाही अबाधित ठेवण्याच्या लढ्याला उजाळा

## जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते उद्घाटन ; आणीबाणीच्या काळातील घटनांवर आधारित प्रदर्शन ; जिल्हा परिषदेच्या प्रांगणात प्रदर्शनाचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**



देशात २५ जून १९७५ रोजी लागू झालेल्या आणीबाणीला ५० वर्षे पूर्ण झाली. त्यानिमित्त जिल्हा परिषदेच्या प्रांगणात आयोजित विशेष प्रदर्शनाचे उद्घाटन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या हस्ते झाले. या प्रदर्शनामध्ये आणीबाणीच्या काळातील आव्हानात्मक परिस्थितीत लोकशाहीच्या रक्षणासाठी केलेल्या प्रयत्नांना उजाळा देण्यात आला आहे. जिल्हा प्रशासन व बीड जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित या प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी ▶▶ उर्वरित पान २ वर

# भटक्या विमुक्तांना न्याय देण्यासाठी प्रशासन खंबीर पाठीशी राहणार : अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांचे प्रतिपादन

## महसूल विभाग व भटके विमुक्त विकास परिषदेच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियानांतर्गत बीडला भटक्या विमुक्तांसाठी शिबिराचे आयोजन

**बीड । प्रतिनिधी**

व्ही.आय.पी. लॉन्स पेठ बीड येथे महाराष्ट्र राज्य भटके -विमुक्त विकास परीषद व शासनाच्या वतीने राजे उमाजी नाईक महाराजस्व अभियान व छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत भटक्या - विमुक्त जातीतील लोकांना प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते .



या शिबिराचे उद्घाटक म्हणून अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक , बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके , डॉ सुभाष जोशी , माजी जि प अध्यक्ष मीराताई गांधले , नायब तहसीलदार प्रशांत जाधवर , प्रशांत सुपेकर , भाजप भटके विमुक्त आघाडीचे जिल्हाध्यक्ष डॉ लक्ष्मण जाधव , भटके विमुक्त मित्रमंडळ सदस्य - बालाजी पवार , भूषण पवार , राजेंद्र बन , डॉ . पैठणकर , डॉ श्रीमती चोले , सामाजिक कार्यकर्ता बाबासाहेब कोकाटे , नेहा माळी , महसूल विभाग अधिकारी , मंडळ अधिकारी , तलाठी , ग्रामसेवक , ▶▶ उर्वरित पान २ वर

# सराईत चोरांच्या स्थानिक गुन्हे शाखेने बांधल्या मुस्क्या

## श्रीरामपूर येथून दोघांना अटक ; मोटर सायकल जप्त

**बीड । प्रतिनिधी**

बीड शहरात दि. ८ जून रोजी दिवसा-दिवसा दोन महिलांच्या गळ्यातील सोन्याचे गंठण हिसकावून पळ काढणाऱ्या दोन सराईत चेन स्नॅचरांना स्थानिक गुन्हे शाखा, बीडच्या पथकाने अटक केली असून, त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेली मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. दोन्ही आरोपी हे अहमदनगर जिल्ह्यातील श्रीरामपूर ▶▶ उर्वरित पान २ वर



# ९५ हजारांची लाच घेताना पोलीस निरीक्षकांसह महिला पोलीस अटकेत

**धाराशिव । प्रतिनिधी**

राज्यात गेल्या काही महिन्यांपासून लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या कारवाईने जोर धरला असून अनेक बडे मासे जाळ्यात अडकत आहेत. विशेषत: महसूल खात्यात तहसिलदार, तलाठी ते ग्राम सेवकांपर्यंत अनेक अधिकारी लाचलुचपत विभागाच्या जाळ्यात अडकले आहेत. आता, पोलीस खात्यातील अधिकाऱ्यावर एसीबीने कारवाई केली आहे. दोन लाख रुपयांच्या लाचेची मागणी करत ९५ हजार रुपये स्वीकारताना धाराशिव ग्रामीण पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक व महिला पोलीस अंमलदार यांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात अटक केली. याप्रकरणी आरोपींवर पोलिसांवर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात दाखल ३०६ अंतर्गत गुन्ह्यातील आरोपीला मदत ▶▶ उर्वरित पान २ वर



# तलवाडा पोलीसांची अवैधरीत्या वाळू वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर वर कारवाई

## सहा लाख पन्नास हजाराचा मुद्दे माल जप्त



**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा पोलीस स्टेशन हद्दीतील तपोनिमगाव येथे २४/०६/२०२५ रोजी एक वाजता चे सुमारास गोपनीय शाखेचे विठ्ठल राठोड, यांना अवैद्यरित्या वाळू ट्रॅक्टर भरून वाहतूक करत असल्याची गोपनीय माहिती मिळताच सदर ठिकाणी जाऊन ट्रॅक्टरचा पाठलाग करून वाळू भरलेल्या ट्रॅक्टर चोपड्याची वाडी येथे पकडला. सदर वाळूने भरलेल्या ट्रॅक्टर पोलीस ठाणे तलवाडा येथे लावण्यात आला आहे. विठ्ठल राठोड यांनी सरकार तर्फे फिर्याद दिली आहे. सदर वाळूने भरलेला ट्रॅक्टर एकूण ६०५०००/सहा लाख पाच हजार रुपये मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत , अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पंडकर पोलीस उपविभागीय मिना ,सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज निलंगेकर, उपनिरीक्षक स्वापनिल कोळी,यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक श्याम गायकवाड, गोपनीय शाखेचे विठ्ठल राठोड, भिमसेन जाधव, अमोल अवसरमल, विकास थोरात ,यांनी कारवाई केली आहे.

# चकलांबा पोलिसांनी पकडला वाळू वाहतूक करणारा हायवा !

## एक आरोपी ताब्यात;25 लाखांचा मुद्देमाल जप्त



**चकलांबा । प्रतिनिधी**

पोलीस अधिक्षक नवनीत कॉंवत यांनी जिल्ह्यात अवैध धंद्यावर कठोर कारवायाच्या दिलेल्या सुचनेनुसार चकलांबा पोलिसांच्या वतीने कारवाईची मोहीम राबविण्यात येतं आहे. उमापूर-माटेगाव रस्त्यावर वाळू वाहतूक करणारा एक हायवा सपोनि संदीप पाटील व त्यांच्या सहकाऱ्यांनी रस्त्यावर वाहने आडवी लावून ताब्यात घेतला आहे. यावेळी एका आरोपीला पकडण्यात आले असून या कारवाईत २५ लाख १५ हजारांचा मुद्देमाल ▶▶ उर्वरित पान २ वर

# 76 लाख वाढीव मतदानासंदर्भातील याचिका हायकोर्टाने फेटाळली; प्रकाश आंबेडकरांना धक्का



**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील विधानसभा निवडणुकांच्या निकालावर सर्वच विरोधी पक्षांनी शंका उपस्थित करत निवडणूक आयोगाला लक्ष्य केलं होतं. विशेष म्हणजे, शिवसेना उबाठा पक्षाचे खासदार संजय राऊत आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी थेट निवडणूक आयोगावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सायंकाळी ६ नंतर वाढलेल्या ७६ लाख मतदारांचा आकडा संशयास्पद असल्याचे म्हटले होते. दुसरीकडे वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख प्रकाश आंबेडकर यांनी याबाबत उच्च न्यायालयात धाव घेतली होती. ▶▶ उर्वरित पान २ वर

# आ.संदीप क्षीरसागरांची 'आमदार आपल्या गावी व दारी' मोहीम नागरिकांसाठी दिलासादायक

## पाली, लिंबागणेश, मांजरसुंबा पंचायत समिती गणातील नागरिकांच्या सुटल्या अडचणी



**बीड । प्रतिनिधी**

आ.संदीप क्षीरसागर यांनी 'आमदार आपल्या गावी व दारी' ही संकल्पना घेऊन बुधवारी (दि.२५) रोजी बीड तालुक्यातील लिंबागणेश, मांजरसुंबा आणि पाली पंचायत समिती गणांमधील नागरिकांच्या अडचणी सोडवण्यासाठी विशेष मोहीम राबवली.

या मोहिमेदरम्यान प्रशासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांच्या सहभागाने गावकऱ्यांच्या समस्या जाणून घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्यात आल्या.यावेळी सामाजिक कल्याणकारी योजनांचा लाभ थेट गावकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी श्रावण बाळ योजना आणि संजय गांधी निराधार योजनेची मंजूरी पत्रे ग्रामस्थांना वितरित करण्यात आली. या उपक्रमामुळे गावकऱ्यांना शासकीय योजनांचा लाभ मिळण्यास मदत झाली असून, स्थानिक पातळीवर प्रशासकीय सहकार्य वाढल्याचे दिसून आले. आ.क्षीरसागर यांनी या मोहिमेद्वारे गावकऱ्यांशी थेट संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध असल्याचे सांगितले. हा उपक्रम ग्रामीण भागातील नागरिकांसाठी दिलासादायक ठरला आहे. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष ▶▶ उर्वरित पान २ वर





# लोकराजा छत्रपती राजर्षी शाहू महाराज

छत्रपती शिवाजी महाराजांच्या नंतर अडीचशे वर्षांनी कोल्हापूर संस्थानातून शाहू महाराजांच्या रुपाने सत्तेचा उपयोग लोककल्याणासाठी करणारा एक दुसरा महापुरुष उदयाला आला. शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानात गोरगरिबांसाठी, दीनदलीतांसाठी, सकल बहुजनांसाठी अनेक सुधारणा केल्या आणि पुरोगामी विचारांचा सतत पाठपुरावा केला. त्यांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात आणि पर्यायाने भारतात समाज सुधारणेला चालना मिळाली.

आजच्या कोल्हापूर जिल्ह्यातील तालुक्याचे ठिकाण असलेल्या कागलच्या घाटगे परिवारात जयसिंगराव उर्फ आबासाहेब व राधाबाई या दाम्पत्याच्या पोटी २६ जून १८७४ रोजी यशवंतराव हे पुत्ररत्न जन्माला आले. हेच यशवंतराव पुढे कोल्हापूरच्या गादीचे राजे राजर्षी शाहू छत्रपती महाराज होत. घाटगे घराण्याचे छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळापासून स्वराज्यात योगदान होते व नंतर छत्रपतींच्या घराण्याशी अनेक पिढ्यांचे नातेसंबंध होते. यशवंतरावांचे वडील जयसिंगराव उर्फ आबासाहेब यांचे बालपण छत्रपतींचा भाचा या नात्याने कोल्हापूरच्या राजवाड्यात मोठ्या कौतुकात गेले होते. कागलच्या घाटगे घराण्यातील पूर्वज हे आदिलशाही दरबारातील एक नामांकित सरदार घराणे होते. आपल्या शौर्याच्या बळावर आदिलशहाकडून सर्जेराव हा किताब या घराण्याने पूर्वी प्राप्त केला होता. त्यामुळे राजकीय व सामाजिक क्षेत्रातील उत्तम अशा कार्यकर्तृत्वाचा वारसा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांना आपल्या कुटुंबातूनच लाभला होता. त्यामुळे पुढे एक राजा म्हणून सामाजिक आणि राजकीय अशा दोन्ही मार्गामध्ये वाटचाल करत असताना क्रांतिकारक अशा निर्णयांच्या माध्यमातून शाहू महाराजांनी आपल्या कार्यकर्तृत्वाची अमिट अशी छाप उमटविली. सत्तेचा उपयोग समाजप्रबोधन, समाजपरिवर्तन आणि समाज सुधारण्यासाठी केला. म्हणूनच छत्रपती शिवाजी महाराज आणि क्रांतीसुर्य महात्मा जोतिराव फुले यांचे कृतिशील वारसदार म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते. विद्याहीन, धनहीन, सत्ताहीन आणि दिशाहीन बहुजन समाजाच्या दुःखाला वाचा फोडणारा पहिला वाली मिळाला तो महात्मा जोतिराव फुले यांच्या रूपाने. बहुजन समाजाच्या दुःख व दैन्याचे मूळ त्यांच्या अज्ञानात व अंधश्रद्धेत आहे आणि या दोन्हींच्या निर्मूलनास शिक्षणाशिवाय दुसरा उपाय नाही हे महात्मा फुले यांच्या लक्षात आलं आणि त्यांनी त्या दृष्टिकोनातून काम करण्याला प्राधान्य दिले. तोच वारसा पुढे छत्रपती राजर्षी शाहू महाराजांनी चालवला. महात्मा फुले आणि शाहू महाराज यांच्याच मार्गावरून चालत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हा वारसा आणि विचार पुढे नेला आणि स्वातंत्र्यानंतर तो संविधानात उतरवला. आपणाला मिळालेला राज्याधिकार हा राजवैभव, राजविलास यांचा उपभोग घेण्यासाठी नसून तो रंजल्या गांजल्या प्रजाजणांच्या विशेषता गरीब व अज्ञानी जनतेच्या उद्धारासाठी आहे, अशी राजाच्या उपभोगशून्य स्वामीत्वाची जाण शाहू महाराजांच्या ठिकाणी राज्यारोहणाच्या क्षणापासूनच होती असे लक्षात येते. राज्यारोहणापूर्वी कारभाराच्या प्रशिक्षणाचा एक आत्यावश्यक भाग म्हणून महाराजांकडून त्यांच्या शिक्षकांनी संस्थानच्या सर्व भागांचा दौरा करून घेतला होता. या दौऱ्यात खेड्यापाड्यातील, डोंगराळ म ुलखांतील गरीब रयतेची दयनीय अवस्था त्यांनी जवळून पाहिली होती. डोळस नजरेने त्यांनी रयतेच्या दारिद्र्याचे दशावतावर टिपले होते आणि म्हणूनच राज्याधिकार मिळाल्यावर हा राजा राजवाड्याच्या विलासात मग्न न होता आपल्या राज्यात सतत फिरत राहिला, आपल्या रयतेचे दुःख दैन्य त्याची कारणे शोधत राहिला आणि त्यावर उपाययोजना करत राहिला.

## पान १ वरून पुढे...

### ग्रामीण पाणी...

मागितल्याची खातर जमा करत एसीबीने ८० हजार रुपये देताना कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे व लिपिक किरण हावळे दोघांना रंगेहत पकडल्याने बीड जिल्ह्यात खळबळ माजली आहे. एका क्लास वन अधिकाऱ्याला लाच घेताना पकडल्याने आश्चर्य व्यक्त केले जात असून. बीड जिल्ह्यात अनेक लाचखोर अधिकारी कामे केल्यानंतर बिले काढण्यासाठी मोठ्या रकमा मागत आहेत. बीड जिल्हा परिषद मध्ये तर लाचखोर अधिकाऱ्यांचा भरणाचा आहे या ठिकाणी टक्केवारी दिल्याशिवाय कोणतेच काम होत नसल्याचे दिसून येत आहे. यातच सार्वजनिक बांधकाम विभाग व महसूल विभागातही भ्रष्टाचार फोफावला आहे. जिल्हाधिकारी पदावर तरुण विवेक जॉन्सन पदावर आहेत तर दुसरीकडे जिल्हा परिषदेचे कारभारी नवीनच आलेले आहे. यापूर्वी मोठ्या अधिकाऱ्यावर कारवाई झालेली आहे यामध्ये अप्पर जिल्हाधिकारी यासह भूजल चे कार्यकारी अभियंता यांनाही एसीबीने अटक केली होती. महसूल बांधकाम व जिल्हा परिषद मधील अनेक अधिकारी कर्मचारी एसीबीच्या रडावर आहेत. या ठिकाणी टक्केवारी दिल्याशिवाय कामे होत नसल्याने अनेक गुत्तेदार या अधिकाऱ्यांच्या जाताला कंटाळलेले आहेत. ग्रामीण पाणी पुरवठ्याचे कार्यकारी अभियंता मुकुंद आंधळे हे इनामदारीचे हाव आणत असे. विशेष म्हणजे त्यांना पत्रकारांची एलर्जी होती. पत्रकारांना भेटणे व माहिती देणे नेहमीच टाळत असे. अशा भ्रष्टाचारी अधिकाऱ्याची सर्व कुंडली बाहेर येणे आवश्यक आहे. यांची संपूर्ण चौकशी करत एसआयटी मार्फत त्यांची संपत्तीची माहिती घेतल्यास मोठे घबाड हाती लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. बीड जिल्ह्यात कार्यकारी अभियंता पदावर असणाऱ्या आंधळे यांच्यावर एसीपी ने कारवाई केल्याने अधिकाऱ्यांमध्ये खळबळ माजली आहे.

### विशेष प्रदर्शनाच्या...

अधिकारी जतिन रहमान, अपर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव साळुंखे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी डॉ. श्याम टरके, जिल्हा परिषदेतील सर्व वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी आदींची उपस्थिती होती. या प्रदर्शनाच्या माध्यमातून नव्या पिढीला त्या काळातील घटनांचा इतिहास आणि लोकशाहीच्या संरक्षणाचे महत्त्व समजण्यास मदत होणार असल्याचे मत जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी व्यक्त केले. याबरोबरच शालेय विद्यार्थ्यांसह सर्वांनीच या प्रदर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहनही श्री. जॉन्सन यांनी केले. आणीबाणीच्या ५० व्या वर्षपूर्तीनिमित्त हे विशेष

## पान १ वरून पुढे...

प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. या प्रदर्शनात आणीबाणीच्या काळातील महत्त्वाच्या घटना आणि लोकशाहीच्या पुनर्स्थापनेसाठी केलेल्या संघर्षाचा इतिहास चित्रांच्या माध्यमातून मांडण्यात आला आहे. आणीबाणीशी संबंधित विविध घटना, घडामोडी, त्या काळात लोकशाहीसाठी लढणाऱ्या मान्यवरांची छायाचित्रे, तसेच संक्षिप्त पण माहितीपूर्ण मजकूर आणि माहिती फलकांचा समावेश आहे. या प्रदर्शनात आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्षाचा संक्षिप्त परिचय आणि त्यातील महत्त्वाचे टप्पे यांची मांडणी करण्यात आली आहे.

### भटक्या विमुक्तांना...

आरोग्य विभाग अधिकारी , नगरपरिषद अधिकारी उपस्थिती होती . यावेळी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना भटके – विमुक्त विकास परीषद जिल्हा संयोजक ओमप्रकाश गिरी यांनी विकास परिषदेच्या कार्याचा लेखाजोखा मांडला . राज्यात आजपर्यंत ३५००० लाभार्थ्यांना प्रमाणपत्र मिळवून देण्याचे भाग्य लाभल्याची माहिती दिली . यावेळी भटके विमुक्त विकास परीषद मराठवाडा प्रांत संयोजक उमेश जोगी , डॉ.सुभाष जोशी , डॉ.पैठणकर यांनी भटके विमुक्त मित्र मंडळ प्रत्येक वस्ती पर्यंत पोहचून हे अभियान यशस्वी करण्यासाठी प्रयत्न करत आहे असे मत मांडले . भटक्या विमुक्त समाजाच्या अनेक समस्या आहेत . समाजाच्या मुख्य प्रवाहापासून हा घटक लांब आहे . इंग्रजांच्या काळापासून या समाजाचे राष्ट्रनिर्मितीत महत्त्वाचे योगदान आहे . या समाजाला पुढे आणणे हे प्रत्येकाने आपले कर्तव्य समजले पाहिजे , अशी भावना त्यांनी यावेळी व्यक्त केली . या शिबिरात जात प्रमाणपत्र, आयुषमान भारत कार्ड, आधार कार्ड, रेशन कार्ड, उत्पन्न प्रमाणपत्र देण्यासाठी ३५० लाभार्थी यांची नोंदणी प्रक्रिया पूर्ण करण्यात आली .बीड जिल्ह्यातील सर्व वस्तीचे सर्वेक्षण करून भटके विमुक्त विकास परिषदेने शासनाच्या या कार्यात मोलाचे सहकार्य केले त्याबद्दल जिल्हा अभियान प्रमुख बबन गिरी व भगवान पवार यांचा प्रशासनाच्या वतीने सन्मान करण्यात आला . यावेळी आपले मनोगत व्यक्त करताना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी नमूद केले की भटक्या विमुक्त समाजासाठी अनेक जण आपापल्या परीने प्रयत्न करीत आहेत . माननीय अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी कोल्हापूर येथे कार्यरत असताना या समाजासाठी मोठ्या प्रमाणात कार्य केले आहे . विविध प्रमाणपत्रांचे वाटप केले आहे . आपण माननीय जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या मार्गदर्शनाखाली बीड जिल्ह्यात सुद्धा भटक्या विमुक्त जाती जमातीसाठी विविध प्रमाणपत्रांचे वाटप करण्याची मोहीम कायमस्वरूपी सुरू ठेवू . या समाजासाठी रहिवासी प्रमाणपत्र काढणे , उत्पन्नाचे प्रमाणपत्र काढणे , जातीचे प्रमाणपत्र काढणे यासाठी आवश्यक

## पान १ वरून पुढे...

त्या सर्व सुविधा तहसील कार्यालयामार्फत उपलब्ध करून दिल्या जातील . याशिवाय इतर कार्यालयात सुद्धा कोणत्याही अडचणी येत असतील तर अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक साहेब आणि आमची सर्व टीम सदैव कार्यरत असेल अशी हमी त्यांनी यावेळी दिली .बीड जिल्ह्यातील भटक्या समाजाच्या वस्तीवरील शेवटच्या माणसांना प्रमाणपत्र उपलब्ध करून देण्याची हमी प्रशासनाच्या वतीने अपर जिल्हाधिकारी यांनी दिली व प्रशासन भटक्या विमुक्तांच्या खंबीर पाठीशी राहणार असल्याची ग्वाही दिली. यावेळी भटक्या विमुक्त समाजातील मसणजोगी समाज अध्यक्ष हनुमंत मोरे , नाथ जोगी समाज अध्यक्ष रंगनाथ पैठणकर , गोसावी समाज अध्यक्ष राजेंद्र बन आदी जण समाज बांधवासह उपस्थित होते . तसेच या कार्यक्रमाला प्रमाणपत्र वितरण हस्तगत करण्यासाठी भटक्या –विमुक्त जाती जमातीतील अनेक गरजवंत उपस्थित होते .

### सराईत चोरांच्या...

येथून अटक करण्यात आले आहेत. पहिली घटना दि. ८ जून रोजी दुपारी ३ वाजता घडली. फिर्यादी ज्योती विजय उदावंत (रा. उमरखेड, जि. यवतमाळ) या त्यांच्या मुलीसोबत नातवाच्या साखरपुड्यासाठी बीड येथे आल्या होत्या. खरेदीसाठी राजीव गांधी चौकात रिक्षामध्ये बसत असताना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञात चोरट्यांनी त्यांच्या गळ्यातील सुमारे २० ग्रॅम वजनाचे, ९०,००० रुपये किमतीचे सोन्याचे गंठण हिसकावले. दुसऱ्या घटनेत, फिर्यादी शिल्पा अमोल वाव्हळ (रा. फुलाईनगर, बीड) या डी.पी. रोडवरील खरेदीसाठी स्कुटी उभी करत असताना दुचाकीवर आलेल्या दोन अज्ञातांनी त्यांचे १३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे मिनी गंठण हिसकावून पळ काढला. या दोन्ही घटनांनंतर बीड शहर पोलीस ठाण्यात स्वतंत्र गुन्हे दाखल करण्यात आले होते.या गंभीर प्रकाराची दखल पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी घेतली आणि स्थानिक गुन्हे शाखेला तपासाची जबाबदारी सोपवली. पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पथके तयार करण्यात आली. पोलीस उपनिरीक्षक महेश विघ्ने यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, सुमीत सुभाष रुपेकर (वय १९, रा. सजापुर वाळूज, जि. छत्रपती संभाजीनगर) आणि अजय संजय पंडीत (वय २०, रा. निपाणी वडगाव, ता. श्रीरामपूर, जि. अहमदनगर) हे दोघे गुन्ह्याचे प्रमुख आरोपी असल्याचे निष्पन्न झाले.त्यानुसार पथकाने तत्काळ श्रीरामपूर येथे जाऊन अशोकनगर भागातून दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी दोन्ही गुन्ह्यांची कबुली दिली असून गुन्ह्याच्या वेळी वापरलेली मोटारसायकल पोलिसांनी जप्त केली आहे. आरोपींना पुढील तपासासाठी शिवाजीनगर पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असून उर्वरित चोरीस गेलेल्या सोन्याच्या गंठणाचा शोध सुरू

## पान १ वरून पुढे...

आहे.ही कामगिरी पोलीस अधीक्षक नवनीत काँवत, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर आणि पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, राहुल शिंदे, महेश जोगदंड, राजु पठाण, बप्पासाहेब घोडके आणि गणेश मराडे यांनी केली.

### ९५ हजारांची...

करण्यासाठी पोलीस निरीक्षकांकडून लाचेची मागणी करण्यात आली होती, अशी प्राथमिक माहिती आहे. २ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करुन तडजोडी अंति ९५ हजार रुपये रक्कम घेण्याचे पोलिसांनी मान्य केले होते. मात्र, तक्रारदाराने लाच लुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार दाखल केल्यानंतर एसीबीने सापळा रचून ही कारवाई केली. त्यात, धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक मारुती शेळके व एका महिला अंमलदार लोखंडे यांना लाच लुचपत विभागाने ताब्यात घेतले असून याप्रकरणी गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

### 76 लाख...

न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर २५ जून रोजी निकाल देण्याचे जाहीर केले होते. त्यानुसार, आज प्रकाश आंबेडकर यांची याचिका फेटाळली आहे. तसेच, न्यायालयाचा वेळ वाया घालवला असं निरीक्षणही नोंदवलं आहे. लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी अनेकदा महाराष्ट्रातील निकालावर शंका उपस्थित केली होती, तर दोनच दिवसांपूर्वी त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नागूपरमधील मतदारसंघातील मतांची आकडेवारी शेअर करत प्रश्न उपस्थित केला होता. न्यायालयाच्या निर्णयावर आज भूमिका मांडणार– न्यायालयाने निर्णय दिला असून चेतन चंद्रकांत अहिरे यांची याचिका फेटाळली आहे. न्यायालयाकडून हा निकाल अपलोड झाल्यानंतर नेमकं याचिका फ ेटाळण्याचं कारण काय हे पाहता येईल. त्यानंतरच, मी माझी प्रतिक्रिया देईल असे प्रकाश आंबेडकर यांनी म्हटलं आहे. २६ जून रोजी सकाळी ११.३० वाजता मी मुंबईतील कार्यालयात पत्रकारांशी संवाद साधणार आहे, अशी माहितीही आंबेडकर यांनी दिली.

### आ.संदीप क्षीरसागरांची...

राजेंद्र मस्के यांच्यासह तहसील कार्यालयाचे सर्व अधिकारी, पंचायत समिती, महावितरण, कृषी विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग, पाणीपुरवठा विभाग, लघुपाटबंधारे विभाग आदी प्रशासकीय विभागांचे अधिकारी व चौसाळा जिल्हा परिषद गटातील गावांमधील नागरिक उपस्थित होते.

## पान ४ वरून पुढे...

### राजर्षी छत्रपती शाहू....

यांचा पुतळा ते सामाजिक न्याय भवनापर्यंत समतादिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. सदर समता दिंडीचा मार्ग सुभाष रोड, शिवाजी महाराज पुतळा ते सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड असा असुन सामाजिक न्याय भवनात समता दिडीचा समारोप होईल. तसेच मुख्य कार्यक्रम सकाळी ११.०० वाजता सुरु होईल. सदर सामाजिक न्याय दिनाच्या कार्यक्रमास नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त, प्रदिप भोगले यांनी केले आहे.

### चक्क हातपम्प...

गटार साफ करतांना संबंधित सफाई कामगार, संबंधित स्वच्छता निरीक्षक यांच्या लक्षात आले नसेल का ? पालिका प्रशासनाने या कामाची गुणवत्ता तपासली नसेल का ? बिले निघण्या आगोदर संबंधित कामाची नियमावली, निकष, कार्य पद्धत, गुणवत्ता या सर्वांची पायमल्ली झाली असल्याचे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

### सामन्याच्या विविध...

परिस्थितीत त्यांनी आपल्या कार्यालयाच्या चकरा मारणे आणि आपण आणि आपल्या कर्मचाऱ्यांनी त्यांची दखल न घेता त्यांच्याकडे दुर्लक्ष करणे ही बाब लाभार्थ्यांवर अन्याय करणारी आहे. तेव्हा आपण अशा लाभार्थ्यांची जाणीवपूर्वक दखल घेऊन, त्यांच्या अडचणी सोडवून रखडलेल्या पगारी देणे तसेच अंबाजोगाई तालुक्यात अनेक गोरगरीब कुटुंब आहेत, ज्यांना रेशन मिळत नाही, मात्र उपजीविकेसाठी त्यांना रेशनची आवश्यकता आहे, अशा कुटुंबांना रेशन दुकानावरून रेशन मिळेल यासाठी शिधापत्रिका द्याव्यात. तरी निवेदनाची दखल घेऊन योग्य ती कार्यवाही त्वरित करावी. अन्यथा जनहितार्थ आंदोलन छेडण्यात येईल, याची आपण नोंद घ्यावी. असा इशारा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी दिला आहे. यावर चर्चा करताना तहसीलदार विलास तरंगे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या मागण्याचा गांभीर्याने विचार करून लवकरात लवकर प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन राजकिशोर मोदी यांना दिले. सदरील निवेदनावर राजकिशोर मोदी यांच्यासह महादेव आदमाने, डॉ.राजेश इंगोले, किशोर परदेशी,धम्मा सरवदे, खालेद चाऊस रफिक गवळी, अशोक देवकर, बबन पाणकोळी, सुभाष पाणकोळी, अकबर पठाण,सुधाकर टेकाळे, सचिन जाधव आकाश कराड, दत्ता सरवदे, चेतन मोदी, सय्यद ताहेर, खलील जाफरी, मुन्ना पठाण, शरद काळे, महेबूब गवळी, जावेद शेख, गोविंद पोतंगले,

## पान ४ वरून पुढे...

रोशन लाड, कमलाकर हेडे, फारूख शेख चाँद, अकबर पठाण, वजीर शेख, सय्यद रशिद, संतोष चिमणे, सुदाम देवकर, संतोष माने, सचिन जाधव, शुभम लखेरा, महेश कदम, रोहन कुरे, अमीत परदेशी, अस्लम शेख, जमदार पठाण, विश्वजीत शिंदे, विशाल पोटभरे, महेश वेडे, मुन्ना वेडे, राम घोडके, निखिल वांजरखेडकर, सिध्दार्थ साबळे, कैलास कांबळे आदींसह अनेकांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

### जिद्द, कष्ट,...

कार्यालयात आयोजित केलेल्या कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ.महारुद्र डाके(शिक्षण तज्ञ) हे होते तर प्रमुख पाहुणे डॉ.अर्चना पवार,प्रा.डॉ.प्रशांत तौर,सौ. तौर,व्यापारी संघाचे अध्यक्ष सुरेंद्र रेदासनी हे होते तर विशेष उपस्थितीमध्ये पत्रकार वैजनाथ घायतिडक, रविंद्र राऊत,मुख्याध्यापक अभिमन्यू इबिते,लक्ष्मण जगताप,प्रिन्सिपल सय्यद अन्वरसर,टाकरवणचे सरपंच सुनील तौर,व्यापारी तुकारामनाना सोळंके व इतर उपस्थित होते. यावेळी या क्लासेसची विद्यार्थीनी कु.धनश्री रविंद्र राऊत ही नीट मध्ये सर्वप्रथम आल्याने तिचे पालक पत्रकार रविंद्र राऊत यांचा मान्यवरांचे हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी डॉ.लहाने म्हणाले कि,गरिबीचे मुले म ोठे होतात तेच मोठे होऊ शकतात.कारण त्यांना परिस्थितीची पुर्ण जाणीव असते.गेल्या २१ वर्षांपासून आम्ही प्लास्टिक सर्जरी करतोत.जगातील ९५देशात सदरील काम करतोत.यशाचा पासवर्ड म्हणजे अभ्यासामध्ये सातत्य असणे गरजेचे आहे.निष्चय करा,अभ्यास करण्याची सिस्टीम ठरवा.मुलांना कष्ट करण्याची सवय लावा.यश मिळवण्यासाठी कामीटमेंट, कनसिस्टंशी,सिस्टीम, कॉन्फिडन्स,कनेक्टिव्हिटी हे आवश्यक आहे. त्यामुळे कोणत्याही क्षेत्रात यश मिळू शकते.अपयश हे यशाचे गुरुकिल्ली आहे.त्यामुळे मुलांनी अपयशाला न घाबरता त्यास सामोरे जाण्यासाठी धैर्याने प्रयत्न केले पाहिजेत. या आरोग्य क्षेत्रात १४ गोल्डमेडल मिळवणारे पद्मश्री डॉ.तात्याराव लहाने हे एकमेव डॉक्टर आहेत.त्यांनी ग्रामीण भागातील अत्यंत बिकट परिस्थितीतुन हे यश संपादन केले आहे.त्यांनी अक्षरशः चिमणी व कंदील यांच्या साह्याने अभ्यास केला आहे. तेच माझे गुरु आहेत.कारण त्यांच्या सहवासामध्ये मी वाढलो.आणि आज आपल्यापुढे जो उभा आहे, त्यांचेमुळेच आहे.तसेच कोणत्याही व्यक्तीच्या स्वभावामध्ये चांगुलपणा असावा लागतो. चांगुलपणामध्ये वेगळा गोडवा असतो,असेही ते यावेळी ते म्हणाले.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.डॉ. प्रशांत तौर यांनी केले तर सूत्रसंचालन अशोक वाडेकर यांनी केले. तसेच आभारप्रदर्शन कु.जान्हवी वाघ हिने केले. यावेळी पत्रकार,पालक व गुणवंत विद्यार्थी,विद्यार्थीनी मोठ्याप्रमाणात हजर होते.हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संजय कुरे,भारत टाकणखार सर,गणेश कुरे सर,तारे

## पान ४ वरून पुढे...

सर, सतीश कांबळे सर व इतरांनी अथक परिश्रम घेतले.

### बीड शहरात....

आले व फिर्यादी यांचे गळयातील २० ग्रॅम वजनाचे सोन्याचे गंठण किं.९०,०००/- रु हे हिसकावुन घेवुन गेले.अश्या वर्णनाच्या फिर्यादीवरुन गुन्हा नोंद झाला होता. तसेच पोलीस स्टेशन बीड शहर येथे दि.०८/०६/२०२५ रोजी फिर्यादी नामे शिल्पा अमोल वाव्हळ रा.फ ुलाईनगर ता.जि.बीड यांनी फिर्याद दिल होती की,फिर्यादी हया त्यांचे मुली सोबत खरेदी कामी डी.पी.रोड बीड येथे गेल्या होत्या. फिर्यादी या त्यांची स्कुटी गाडी स्टॅन्डवर लावत असताना फिर्यादी यांचे जवळ तोंडाला बांधुन मोटार सायकलवर बसुन दोन ईसम आले. यातील समोरील ईसमाने डोक्यावर हेल्मेट घातलेले व अंगात पांढऱ्या रंगाचे शर्ट व काळी पॅन्ट व पायात पांढऱ्या रंगाचे बुट घातलेले दिसुन आले.व मागील ईसम हा काळया रंगाचे जरकीन घातलेला व डोक्यावर पिस्ता रंगाची टोपी घातलेला होती.यातील मागे बसलेल्या ईसमाने फिर्यादी यांचे गळयातील मिनी गंठण वजनी १३ ग्रॅम मागे बसलेल्या ईसमाने ओढून घेवुन गेले यावरुन पो.स्टे. बीड शहर गु.र.नं १००/२०२५ कलम ३०४(२),(५) बी.एन. एस प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला होता. या दाखल गुन्हयांची माहिती पोलीस अधिक्षक नवनीत काँवत साहेब यांना मिळताच त्यांनी सदरील गुन्हयातील आरोपींना अटक करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेला दिले. स्थानिक गन्हे शाखेचे प्रमुख पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड यांनी लागलीचा पथके नेमुन बीड, आहिल्यानगर, छ.संभाजीनगर येथे रवाना केली. पोउपनि महेश विघ्ने यांना गोपनिय माहीती प्राप्त झाली की सदरचा गुन्हा हा आरोंपी नामे १.सुमीत सुभाष रुपेकर वय १९ वर्ष रा.सजापुर वाळुज ता.जि. छ.संभाजीनगर २.अजय संजय पंडीत वय २० वर्षे रा.निपाणी वडगाव ता.श्रीरामपूर जि.अहिल्यानगर यांनी मिळुन केला आहे.व सदरचे दोन्ही आरोपी हे श्रीरामपुर येथे अशोकनगर भागात आहेत. यावरुन श्रीरामपुर येथे जावुन दोन्ही ईसमांना ताब्यात घेतले. सदरचे दोन्ही आरोपीतांनी वर नमुद गुन्हे केले असल्याची कबुली दिली.सदर गुन्हयात गुन्हा करतवेळी वापरण्यात आलेली आरोपी क्रं.०१ याची मोटार सायकल जप्त करण्यात आली आहे.सदर आरोपीतांना पुढील कारवाई कामी पोलीस स्टेशन शिवाजीनगर यांचे ताब्यात देण्यात आले आहे. ऊर्वरीत मुद्येमालाचा शोध स्था.गु.शा.बीड व पो.स्टे.शिवाजीनगर करत आहेत. सदरची कामगिरी मा.श्री नवनीत काँवत साहेब,पोलीस अधिक्षक सोहब बीड, मा.श्री सचीन पांडकर अप्पर पोलीस अधिक्षक बीड, पोनि श्री शिवाजी बंटेवाड,स्थागुशा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि महेश विघ्ने, राहुल शिंदे, महेश जोगदंड, राजु पठाण, बप्पासाहेब घोडके, गणेश मराडे यांनी केली आहे.

## पान ४ वरून पुढे...

### भाजपाचे राजेंद्र ...

सत्तेत नसलेल्या शिवछत्र परिवाराने आमदारकीच्या माध्यमातून सत्ता काबीज केल्यावर आता गेवराई नगर परिषदेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रवेशाचे फटाके फुटत आहेत. विधानसभेच्या वेळी लक्ष्मण पवार यांनी निवडणूक लढवण्याबाबत मागेपुढे निर्णय घेतल्यामुळे कार्यकर्तेही बेचैन झाले होते त्यामुळे नाराजीचा सूर पाहायला मिळाला होता. संजय नगर हा पवार घराण्याचा पिढ्यान –पिढ्या असलेला बालेकिल्ल्याला खिंडार पडलें पक्षाला व लोकांना माझी गरज असे समजून वावरणाऱ्या कार्यसम्राटाच्या राजकारणाचा शुभारंभ झालेल्या प्रभागातून राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी अजित गट या धडाकेबाज प्रवेश सोहळ्याचा मोठा कार्यक्रम आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती राजेंद्र साळुंके मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली.

### असोसिएशन ऑफ...

धुळे –भालचंद्र पाटील, अमरावती –बंडू कुमार धावणे, बुलढाणा –शौकत शहा घासी शहा, अकोला –आकाश नंदू कोकाटे, कोल्हापूर– विक्रम सिंह पवार, रायगड –आशिष अतुल पाटील, यवतमाळ –मनसुख भट्टी यांची निवड करण्यात आली आहे. बीड जिल्हाध्यक्ष पदी दिगंबर सोळंके त्यांची कार्यशैली व समन्वय साधून सशक्त संघटन कौशल्याची दाखल घेऊन फेर निवड करण्यात आल्याने सर्व पत्रकार संघा सह राजकीय, शैक्षणिक, सामाजिक क्षेत्रातील मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

### आष्टी तालुक्यात...

पाठवला आहे.यानंतर संबंधित गुत्तेदारांवर काय कारवाई केली जाणार आहे हे येत्या काही दिवसात समोर येईल. आष्टी तालुक्यामध्ये जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत १७२ गावांमध्ये पाणीपुरवठा करण्याचे कामे सुरू आहेत.यामध्ये १५९ गावांमध्ये पूर्वी असलेल्या पाणीपुरवठा योजना दुरुस्त करून गावाला पाणीपुरवठा करण्यासाठी कामे सुरू आहेत तर केवळ तेरा गावांमध्ये पाणीपुरवठा योजना ही पूर्णपणे नवीन आहे. असे असतानाही संबंधित गुत्तेदारांकडून शासनाने ठरवून दिलेल्या कालावधीमध्ये योजनेचे काम पूर्ण होताना दिसत नाही. आतापर्यंत आष्टी तालुक्यातील केवळ ४६ गावांमध्ये जल जीवन मिशन योजनेचे काम शंभर टक्के पूर्ण झालेले आहे. यामध्ये पूर्णपणे नवीन पाणीपुरवठा योजना राबवण्यात येणाऱ्या गावांची संख्या फक्त तीन आहे.५२ गावांमध्ये जलजीवन मिशनच्या कामामध्ये गुत्तदारांकडून दिरंगाई होताना दिसत आहे तर १६ गावांमध्ये संबंधित गुत्तेदारांनी कामच सुरू केले नाहीत.ज्या गुत्तेदारांनी कामे सुरू केले नाहीत व कामांमध्ये दिरंगाई केले आहे अशा गुत्तेदारांवर कारवाई करण्यात यावी यासाठी आष्टीच्या ग्रामीण ग्रामीण पुरवठा विभागाच्या उपअभियंताने कार्यकारी अभियंता बीड यांच्याकडे अहवाल पाठवला आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

# नारायणा...नारायणा....नगद नारायणा...



## विठुनामाच्या जयघोषात नारायणगड दिंडीचे प्रस्थान; हजारो भाविकांच्या उपस्थितीने नारायणगडवर फुलला भक्तीचा मळा

**बीड । प्रतिनिधी**

नारायण... नारायणा... नगद नारायणा.... असा मनाला चिरशांती देणारा महात्मा नदग नारायण महाराजांचा जप.... पावले चालती पंढरीची वाट.... म्हणत भाविकांना लागलेली पंढरीच्या पांडुरंगाची आस.... आणि हजारो अबालवृद्ध भाविकांच्या उपस्थितीने श्री क्षेत्र नारायण गड भक्तीभावाने फुलून गेला होता. अशा भक्तिमय वातावरणात नारायण गड दिंडीचे प्रस्थान झाले. विशेष म्हणजे यावर्षी दिंडीला वाटे लावण्यासाठीही हजारो महिला-पुरूष भाविकांची उपस्थिती होती. श्री क्षेत्र नारायण गडचे महंत प्रेममूर्ती शिवाजी महाराज यांच्या हस्ते विधीवत पूजा करून या दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी महंत दत्तात्रय महाराज गिरी, नारायण गडचे उत्तराधिकारी महंत संभाजी महाराज, मधुकर महाराज गवारे, सिद्धेश्वर महाराज दगडगावकर, भक्तीदास महाराज शिंदे, लक्ष्मण महाराज तकीक नाना, विठ्ठल गलधर, सिद्धेश्वर महाराज बागलाने, हरी महाराज गवते, राहचल महाराज ढेंगे आदी महाराज मंडळी, टाळकरी, वारकरी उपस्थित होते.

नारायण गडच्या या पालखी सोहळ्यास शतकोत्तर परंपरा आहे. या परंपरेला साजेसा व भक्तीमय वातावरणात हा पंढरपूर पालखी सोहळा सुरू झाला. यावेळी महंत शिवाजी महाराज म्हणाले, की वारकर्यांना विठ्ठलाच्या भेटीची आस लागलेली आहे, ही एकदा पांडुरंगाचे दर्शन घेईल, ही वारकऱ्यांची भावना आहे, या भावनेतून शंभरी ओलांडलेले वारकरी देहभान विसरून विठुनामाच्या गजरात पंढरी गाठून पांडुरंगाचरणी लिन होतात. या वारकर्यांसाठी पिण्याचे पाणी, भोजन, औषधोपचार आदी सोय केल्याचेही महंत शिवाजी महाराज म्हणाले. सायंकाळी चार वाजता नारायण गडवरून दिंडीचे प्रस्थान झाले. यावेळी नगद नारायण महाराजांचा जप, विठुनामाचा गजर... याने वातावरण भक्तिमय झाले होते. यावर्षी दिंडीत सुरुवातीलाच दहा हजार वारकरी सहभागी झाले, तर दिंडीला वाटे लावण्यासाठी दहा हजारांपेक्षा अधिक भाविक उपस्थित होते.

### तलाठी, मंडळअधिकारी कृषीसहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी ग्रामसेवक यांना नैसर्गिक आपत्तीच्या काळात तरी मुख्यालयावर राहण्याचे आदेश द्या: भाई मोहन गुंड

## शंभर पन्नास किलोमीटर वरून नोकऱ्या करतात अधिकारी जिल्हाधिकाऱ्याकडे शेकापची तक्रार

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यात अधिकाऱ्यांना वेळेच बंधन नाही, आयाराम गयाराम सारखी नौकरी केली जाते, सर्वसामान्य माणसांना वेठीस धरले जाते, अधिकारी एवढे मगरू बनत चाललेले आहेत, कुठल्या तरी पुढार्याचे हस्तक होऊन काम करतात अधिकार्यानी आपन सामान्य लोकांचे नौकरी याचे भान ठेवावे, हालगर्जीपना खपवून घेणार नाही. – भाई मोहन गुंड**

कृषी क्षेत्रामध्ये महत्त्वाचे अधिकारी म्हणून तलाठी, मंडळ अधिकारी, कृषी सहाय्यक, कृषी मंडळ अधिकारी, ग्रामसेवक हे शासकीय यंत्रणेतले प्रमुख महत्त्वाचे घटक अधिकारी आहेत. मात्र हे अधिकारी आपल्या नेमणूक झालेले तलाठी, मंडळ अधिकारी सज्जावर तर कृषी सहाय्यक मंडळ अधिकारी मंडळात, ग्रामसेवक मुख्यालयात राहातं नाहीत. पावसाळ्याचे दिवस आहेत कधीही नैसर्गिक आपत्तीचे निर्माण होऊ शकते, म्हणून सदरील अधिकाऱ्यांनी आपल्या नेमुन दिलेल्या मुख्यालयात मुक्कामी रहावे अशी मागणी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे शेतकरी कामगार पक्षाचे युवा नेते भाई मोहन गुंड यांनी केली आहे. बीड जिल्ह्यामध्ये एक ही तलाठी, मंडळाधिकारी आपल्या सज्जावर राहत नाही, स्वतःचे खाजगी रायटर आफीसला बसवलेले असतात आवश्यक कागदपत्रावर सह्या करण्यापूर्त येतात, सर्व कार्यालय शहरांमध्ये थाटलेले आहेत, आयाराम गयाराम सारखा प्रकार तलाठी मंडळाधिकाऱ्यांचा आहे. कृषी विभागाचे अधिकारी असून नसल्यासारखे आहेत कधीच कार्यालयामध्ये दिसत नाहीत, कार्यालय मध्ये गेलं तर त्यांचे संबंधित विभागाला स्वतःच्या मोबाईल नंबर शेतकऱ्यांना दिसतील असे लिहीले नाहीत, आवश्यक अधिकाऱ्याची विचारणा केली तर साहेब साइटवर गेले म्हणून सांगतात वेळ मारून नेहतात अशा पद्धतीचा कारभार कृषी विभागाचा चालतोय. ग्राम सेवक तर गावात जातच नाहीत पंचायत समीतीत बसुन काम करतात. अनेक कृषीसहाय्यक, कृषी मंडळाधिकारी, तलाठी, मंडळअधिकारी. ग्रामसेवक मुख्यालया पासुन ५० /१०० किलोमीटर अंतरावरुन येऊन नौकरी करतात. नैसर्गिक आपत्ती झाली यांना दुसऱ्या दिवशी कोणाच्यातरी सांगण्या वरून बातमी बघुन कळते रात्री गावाकडे पाऊस झाला, मग येणार पंचनामा करायला अशी परिस्थिती आहे, यामुळे किमान नैसर्गिक आपत्तीचा काळ पाहता महसुल विभाग, कृषी विभाग खूप महत्त्वाचा विभाग आहे यामुळे त्यानी आपल्या मुख्यालयावर तात्काळ राहावे असे आदेश जिल्हाधिकारी यांनी द्यावेत जो अधिकारी मुख्यालयात राहात नाही आशा कर्मचारी अधिकार्यावर कारवाई करावी असे लेखी पत्र शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड, ॲड गोले पाटील, भाई अशोक रोडे, भाई अर्जुन सोनवणे यांनी जिल्हाधिकारी यांना निवाशी जिल्हाधिकारी यांच्या मार्फत दिले

# बीडचा अभिमान! फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांचे एकाच महिन्यात दोन चित्रपट प्रदर्शित

### सत्यकथा बळीराजाची.. ठिणगी संसाराची चा भव्य प्रीमियर बीडमध्ये; पत्रकार, शेतकऱ्यांसाठी मोफत प्रीमियर शो बीडमधील संतोषीमाता टॉकीज येथे २७ जून रोजी दुपारी २.३० वाजता

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्याच्या मातीत जन्मलेले आणि अभिनयाच्या जगतात आपली स्वतंत्र ओळख निर्माण करणारे फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांनी पुन्हा एकदा प्रेक्षकांची मने जिंकली आहेत. मागील महिन्यात महाराष्ट्रभर ४०० टॉकीजमध्ये प्रदर्शित झालेला त्यांचा चित्रपट वामा लढाई सन्मानाची प्रचंड यशस्वी ठरल्यावर आता त्यांचा दुसरा चित्रपट सत्यकथा बळीराजाची.. ठिणगी संसाराची प्रदर्शनासाठी सज्ज झाला आहे. विशेष म्हणजे दोन्ही चित्रपट एकाच महिन्यात प्रदर्शित होणे ही बाब मराठी चित्रपटसृष्टीसाठी ऐतिहासिक ठरावी अशीच आहे. तर पत्रकार, शेतकऱ्यांसाठी मोफत प्रीमियर शो बीडमधील संतोषीमाता टॉकीज येथे २७ जून रोजी दुपारी २.३० वाजता ठेवण्यात



आला असल्याचे चित्रपटात मुख्य भूमिका साकारणारे महेश कुमार वनवे, दिग्दर्शक फैज अहमद धुळेकर , निर्माता आरिफ शेख, सांगितले.ते मंगळवारी बीडमध्ये अयोजित पत्रकार परिषदेमध्ये बोलत होते. यावेळी दैनिक सूर्योदय संपादक गंगाधर काळकुटे पाटील यांच्यासह दिग्दर्शक फैज अहमद धुळेकर , निर्माता आरिफ शेख, कॅमेरामन सत्तार शेखउपस्थित होते. फिल्मस्टार डॉ. महेश कुमार यांचा नवीन चित्रपट २७ जूनपासून सर्वत्र प्रदर्शित होत आहे. याचा प्रथम प्रीमियर शो बीडमधील संतोषीमाता टॉकीज येथे दुपारी २.३० वाजता आयोजित करण्यात आला आहे. बीडमध्येच प्रीमियर शो घेण्यामागे त्यांचा स्वाभिमान आणि जन्मभूमीवरील प्रेम आहे, हे त्यांनी पत्रकार परिषदेत स्पष्ट केले. यानंतर हा चित्रपट दररोज दुपारी ३ वाजता प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. चित्रपटामध्ये वर्षा पाटील, रूपाली जाधव आणि झरणा सरकार यांच्या मुख्य भूमिका असून, सुरेश वाडकर आणि खुशबू जैन यांच्या सुरेल आवाजातील गाणी प्रेक्षकांच्या मनात घर करतील. फैज अहमद धुळेकर यांच्या दिग्दर्शनाखाली

**● शेतकऱ्यांचे दुःख आणि संघर्षांची साक्ष सांगणारा चित्रपट– सत्यकथा बळीराजाची.. ठिणगी संसाराची हा चित्रपट शेतकरी जीवन, त्यांचे संघर्ष, स्वप्नं आणि सामाजिक वास्तव यावर आधारित आहे. प्रेक्षकांना भावनिक आणि विचारप्रवर्तक अनुभव देणाऱ्या या चित्रपटात डॉ. महेश कुमार यांनी साकारलेली भूमिका अत्यंत परिणामकारक आहे.**

**● प्रेक्षकांमध्ये मोठी उत्सुकता– मागील चित्रपटाच्या यशानंतर डॉ. महेश कुमार यांच्याबद्दल प्रेक्षकांमध्ये प्रचंड उत्सुकता निर्माण झाली आहे. बीडमध्ये आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत त्यांनी सांगितले, बीड ही माझी जन्मभूमी आहे. म्हणूनच मुंबईऐवजी बीडमध्येच माझ्या चित्रपटांचा प्रीमियर शो करणे हा माझा अभिमान आहे. शेतकऱ्यांच्या संघर्षावर आधारित हा चित्रपट प्रत्येकाने जरूर पाहावा.**


**● कौटुंबिक आणि सामाजिक चित्रपट रसिकांच्या पसंतीस उतरतोय– सामाजिक जाणीवा, कुटुंबातील नाती आणि ग्रामीण जीवनाचे दर्शन घडवणारा हा चित्रपट प्रबोधन आणि मनोरंजन यांचा उत्तम मिलाफ आहे. त्यामुळे बीडसह संपूर्ण महाराष्ट्रात हा चित्रपट लोकप्रिय होण्याची चिन्हं दिसून येत आहेत.**

आणि आरिफ शेख यांच्या निर्मितीमध्ये साकारलेला हा चित्रपट तांत्रिकदृष्ट्या समृद्ध असून दैनिक सूर्योदय ग्रुप या डिजिटल मीडिया पार्टनरच्या सहकार्याने प्रेक्षकांपर्यंत पोहोचत आहे.

## जि. प. मा. शा. गेवराई चे 33 एनसीसी कॅडेट्स अहिल्यानगर च्या दिशेने 10 दिवसीय कैंप साठी रवाना : लेफ्ट प्रवीण पंडित

**गेवराई । प्रतिनिधी**

जि. प.मा. शाळा मुलांची गेवराई येथील एनसीसी कॅडेट्स नगर च्या १० दिवसाच्या प्रशिक्षण कैंप साठी रवाना झाले.५१ महाराष्ट्र बटालियन आयोजित कैंप मधे एनसीसी कॅडेट्स आर्मी अधिकाऱ्यांच्या सोबत प्रशिक्षण घेतील. या १० दिवसात कॅडेट्स आर्मी ची शिस्त, वेळेचे पालन, स्वतः ची कामे स्वतः करणे , सकाळी वेळेवर उठून व्यायाम करणे तसेच विविध खेळ आणि आर्मी जवान यांची जीवनशैली



शिकतील.हा कैंप मुलांच्या सर्वांगीण विकाससाठी आणि विशेष करून १० दिवस मोबाईल फोन शिवाय होणार आहे , अशी माहिती एनसीसी विभाग प्रमुख लेफ्टनंट प्रवीण पंडित यांनी दिली.या कैंप साठी शाळेच्या प्रभारी मुख्याध्यापक राजकुमार पोपलघट , तल्हा कादरी, अनिल राऊत, गवळी सर, कुडके सर, गायकवाड सर,करवंदे सर ,झेंडेकर सर,राठोड सर, जोशी सर,काळे सर, श्रीम बनसोडे, इशरत, जेबीन बाजी,रसाळ मॅडम ,होळकर म्याडम,ससे मॅडम पाठक मॅडम, शाळेतील सर्व शिक्षक सहकाऱ्यांनी विद्यार्थांना शुभेच्छा दिल्या.

## विवेक जॉन्सन जिल्हाधिकारी यांच्या हस्ते मयंक चौधरीचा सत्कार

**बीड । प्रतिनिधी**

अबॅकसच्या सर्व स्पर्धेमध्ये मयंक चौधरीने सर्वोत्कृष्ट मानांकन, सर्वोत्कृष्ट स्पर्धक, सर्वोत्कृष्ट विजेता असे अनेक पदक आणि ट्रॉफी मेडल मिळवलेले असल्यामुळे माननीय विवेक जॉन्सन खड जिल्हाधिकारी बीड यांनी मयंक चौधरीचा आज जिल्हाधिकार्यालय बीड या ठिकाणी सत्कार करून शुभेच्छा देवून पाठीवर हात ठेवून असाच अभ्यास करत रहा अशी शाबासकी



दिली. शालेय स्तरावरील सर्वांगिन विकास करण्याच्या मार्गाने अबॅकस गणितीय पध्दतीचा उपयोग होतो. शहरातील अबॅकस ट्रेनिंग केंद्राद्वारे, आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय , राज्य स्तरावर, अबॅकस आणि चॅम्पियनशिप आयोजित केल्या जातात. ए जी सी एल एल लंडन वर्ल्ड एजन्सी आणि इंटरनॅशनल स्तरावरील ऑनलाइन अबॅकस चॅम्पियनशिप तसेच अबॅकस ऑनलाईन लेव्हल प्रमाणे परीक्षा, आंतरराष्ट्रीय अबॅकस असोसिएशन यांच्या सहकार्याने जागतिक स्तरावरील अबॅकस स्पर्धा पात्रता मिळवण्यासाठी अबॅकस लेवल पात्रता परीक्षा सर्वोत्कृष्ट क्रमांकाने मयंक चौधरीने सुद्धा यश मिळवले आहे. अबॅकस लेव्हल परीक्षेमध्ये जाहीर झालेल्या निकालाप्रमाणे मयंक चौधरीने सर्वोत्कृष्ट मानद उडन सायटेशन , मेडल मिळालेलं आहे.

## जयंत वासनिक च्या वाढदिवसानिमित्त झाडांचे वाटप



**बीड । प्रतिनिधी**

तुलसी इंग्लिश स्कूल बीड येथे नववी वर्गामध्ये शिकणारा विद्यार्थी जयंत प्रशांत वासनिक याने स्वतःच्या वाढदिवसानिमित्त शाळेतील सर्व शिक्षकांना व कर्मचाऱ्यांना फळझाडे देऊन एक वेगळा संदेश दिला आहे.

स्वतःच्या वाढदिवसानिमित्त अनेक लोक जाहिरात बाजीवर जास्त भर देतात त्यामधून कोणालाही काही फायदा होत नाही परंतु एका शालेय विद्यार्थ्याने सर्वांना एक नवीन आदर्श घडवून दिला आहे. सर्वत्र अमाप प्रमाणात वृक्षतोड सुरू असून त्याचा परिणाम सर्व मानव जातीला व प्राणीमात्राला भोगाव लागत आहे.तरी देखील कोणालाही याची चिंता वाटत नाही उलट वृक्षतोड ही दिवसेंदिवस वाढतच चालली आहे अशीच वृक्षतोड कायम राहिल्यास या पृथ्वीवर ज्या पद्धतीने वृक्ष संपत चालले आहेत त्याच पद्धतीने इतर जीव जंतूही संपू शकतात कारण झाड जर राहिले नाहीत तर आपल्याला हवा पाणी कुठून मिळेल?आपल्या जीवनामध्ये अनेक वेगवेगळे आनंद व्यक्त करण्याची कारणे असतात त्यानिमित्ताने अवांतर खर्च करण्याऐवजी आपण प्रत्येकाला जर एक झाड भेट दिले किंवा स्वतः लावले तर निश्चितच आपला देश हा पुन्हा एकदा सुजलाम सुफलाम होईल.म्हणून आपण देखील या छोट्या विद्यार्थ्यांचा आदर्श घेऊन वृक्षारोपण सारखे उपक्रम करावेत असे आवाहन तुलसी इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका आयु.उमा जगतकर यांनी केले. याप्रसंगी जयंत प्रशांत वासनिक चे आई वडील तसेच शाळेतील सर्व शिक्षक-शिक्षिका व कर्मचारी उपस्थित होते.

दैनिक मराठवाडा पत्र | दि. २५/०६/२०२५

**टी सी हरवला आहे.**

नाव- मृग्धाली श्रीपतराव इंगोले या नावाचा इयत्ता १२ वी पासचा टी सी बीड ते साक्षळपिंपरी प्रवास दरम्यान हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील मो. नंबर वर संपर्क: ९२८४३ १६७६१ साधावा, योग्य बक्षीस दिले जाईल.

**जाहीर प्रगटन**

**मा. के. सी. माने सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात, बीड, ता.जि. बीड**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक 945 / 2025**
**CNR No. MHBI02000019272025**
**वचिष्ठ पि. भिमराव उबाळे व इतर 3 वि. निरंक**

अर्जदार - 1. वचिष्ठ पि. भिमराव उबाळे, वय-48 वर्षे, धंदा-शेती, रा. च-हाटा ता. जि. बीड 2. प्रयागाबाई भ्र. भिमराव उबाळे, वय- 67 वर्षे, धंदा - घरकाम, रा. च-हाटा ता. जि. बीड 3. कांता भ्र. नारायण घोडके, वय-50 वर्षे, धंदा-घरकाम, रा. घोडका राजुरी ता. जि. बीड 4. इंदुबाई भ्र. राधाकिसन काळे, वय-45 वर्षे, धंदा-घरकाम, रा. चिंचोली माळी ता. जि. बीड

विरुध्द निरंक

**मागणी अर्ज: बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट 1827 चे कलम 2 नुसार मयताचे वारस म्हणुन मिळणे बाबत.**

वरील अर्जदार क. 1 ते 4 यांनी या न्यायालयात मयत भिमराव देवराव उबाळे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी मयत **भिमराव देवराव उबाळे यांचा मृत्यु दिनांक 26/08/2022 रोजी च-हाटा** येथे त्यांचा मृत्यु झाला. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरील मयताचे वारस असल्या बाबत वारसाचे प्रमाणपत्र मिळणे बाबत अर्ज दाखल केला आहे. अर्जदार क. 1 हा मयताचा मुलगा असून अर्जदार क. 2 ही मयताची पत्नी आहे व अर्जदार क. 3 व 4 या मयताच्या विवाहित मुली आहेत. तसेच मयताचे आई-वडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. वरील अर्जदार शिवाय मयताचे इतर कोणीही कायदेशिर वारस नाहीत.

मयत भिमराव देवराव उबाळे यांचे मृत्युनंतर वरील अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामाकरीत व ईतर कार्यालयीन उपयोगा करीता सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहू मयतांचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन दैनिक मराठवाडा मध्ये प्रसिध्द झाल्यापासुन तीस दिवसांच्या आत या न्यायालयात हजर होवुन आपली हरकत कळवावी. जर मुदतीत कोणीही हरकत न कळविल्यास हे न्यायालय अर्जदारांचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयतांचे वारस असल्याबाबतचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

**प्रकरणातील पुढील तारीख 23/07/2025**

आज दिनांक 25 माहे जुन 2025 रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

**(मार्फत - ॲड. एस. एस. उबाळे)**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**शिक्का**

**जाहीर प्रगटन**

**मा.श्रीमती एफ.बी. बेग २ रे सह दिवाणी न्यायाधीश व. स्तर बीड ता.जि.बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर 915 / 2025**
**पारवती व इतर वि. निरंक**

**मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट, १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस हक्क प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

**अर्जदार:** १) पार्वती भ्र. अर्जुन वाघमारे, वयः ५९ वर्षे, धंदा घरकाम, रा. तेलगांव नाका, ता. जि. बीड, २) रुपाली पि. अर्जुन वाघमारे, वयः २६ वर्षे, धंदाः घरकाम, रा. वरील प्रमाणे, ३) लता भ्र. संजय वडमारे, वयः ४१ वर्षे, धंदा : घरकाम, रा. बागपिंपळगांव ता. गेवराई जि. जालना, ४) रेखा भ्र. परमेश्वर ढोबळे, वयः ३९ वर्षे, धंदा घरकाम, रा. विडा ता. केज जि. बीड, ५) जया भ्र. कानिफाथ गायकवाड, वयः ३७वर्षे, धंदा घरकाम, रा. पारगांव ता. वाशी जि. धाराशिव (उस्मानाबाद), ६) श्रध्दा भ्र. संदिप जाधव, वयः २८ वर्षे, धंदा घरकाम, रा. मोरगांव ता. जि. बीड

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात यांचे वारस असल्या बाबतचे प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे. ज्याअर्थी मयत नामे **अर्जुन पि.वालाजी वाघमारे, राहणार तेलगांव नाका, बीड ता. जि. बीड हे दिनांक १४/०५/२०२५ रोजी तेलगांव नाका, बीड ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत.

अर्जदार क. १ ही मयताची पत्नी आहे. तसेच अर्जदार क्र. २ ही मयताची अविवाहित मुलगी असुन अर्जदार क्र. ३ ते ६ या मयताच्या विवाहित मुली आहेत. अर्जदाराशिवाय मयतास कोणीही वारसदार नाहीत.

मयत नामे अर्जुन पि.वालाजी वाघमारे, यांचे निधन झालेले आहे. मयताचे नंतर अर्जदार यांना शासकीय, निमशासकीय व कार्यालयीन उपयोगाकरीता सदर वारस प्रमाणत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिल्यास त्यांना सदरहु मयत अर्जुन पि.वालाजी वाघमारे यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर प्रकरणात पुढील तारीख 28/07/2025 आहे.

आज दिनांक 19/06/2025 रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्याने दिले.

**(विधीज्ञ- श्री. सचिन खाडे)**


**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क. लिपीक**

**शिक्का**

दैनिक ● epaper.marathwadapatra.com
# मराठवाडा पत्र
गुरूवार, दि.२६ जून २०२५ पान ४

## राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जन्म दिनानिमित्त कार्यक्रमाचे आयोजन



**बीड । प्रतिनिधी**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचा जन्मदिवस २६ जून दरवर्षी सामाजिक न्याय दिन म्हणून साजरा करण्यात येतो. सदर सामाजिक न्याय दिनाच्या निमित्ताने सहायक आयुक्त, समाजकल्याण, बीड या कार्यालयाच्या वतीने दि. २६ जून, २०२५ रोजी सकाळी १.०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड येथे मुख्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. मुख्य कार्यक्रमापूर्वी दि. २६ जून, २०२५ रोजी सकाळी ८.०० वाजता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर ▶▶ उर्वरित पान २ वर

# जुन्या पिढीचा इतिहास, नवीन पिढीला दिशादर्शक: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे सन्मान पत्र देऊन कार्याचा गौरव; बीड जिल्ह्यातील कारावास भोगलेल्या ५७ ज्येष्ठांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

लोकशाही मूल्ये, अभिव्यक्ती स्वातंत्र्य अबाधित ठेवण्यासाठी झटलेल्या सर्व जुन्या पिढीचा इतिहास नवीन पिढीला दिशादर्शक आहे. आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेल्या सर्व ज्येष्ठांच्या पाठिशी शासन खंबीरपणे सोबत आहे. आपणास पात्र असलेल्या सर्व सेवा प्रशासनाकडून तत्परतेने देण्यात येतील, असा विश्वास जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी उपस्थितांना दिला. जिल्हाधिकारी कार्यालयात आणीबाणीच्या काळात लोकशाहीकरिता लढा देताना सामाजिक व राजनैतिक कारणासाठी कारावास भोगलेल्या बीड जिल्ह्यातील ५७ जणांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची स्वाक्षरी असलेले सन्मान पत्र जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याहस्ते आज सन्मानपूर्वक देण्यात आले. यावेळी अप्पर जिल्हाधिकारी हरिष धार्मिक, निवासी



उपजिल्हाधिकारी शिवशंकर स्वामी, कारावास भोगलेले विजयकुमार पालसिंगलकर आदींची मंचावर उपस्थिती होती. १९७५ ते १९७७ काळात लागू केलेल्या आणीबाणीच्या काळात भारतीय लोकशाहीच्या रक्षणासाठी व मुल्याच्या जपणुकीसाठी अत्यंत कठोर परिस्थितीत निडरपणे उभे राहिलात. आपण हुकुमशाहीचा धाडसाने प्रतिकार करून, कारावास स्वीकारून स्वातंत्र्य अभिव्यक्ती आणि लोकशाहीच्या मूल्यांसाठी संघर्ष केला. देशाच्या लोकशाही परंपरेचे रक्षण करण्याच्या या लढ्यातील आपल्या योगदानाचा आम्ही अभिमानाने गौरव करीत आहोत. हे सन्मान पत्र आपल्या त्याग, धैर्य आणि दृढतेला सलाम करण्यासाठी आहे. आपण आपल्या कृतीतून विचारांतून आणि त्यागातून नव्या पिढीसमोर लोकशाही म ुल्यांचा आदर्श ठेवला आहे आणि त्याचा आम्हाला अभिमान आहे, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सन्मान पत्रात नमूद केले आहे.

प्रातिनिधिक स्वरूपात श्री. पालसिंगलकर, कुसुम सरवदे, उद्धव नागरगोजे, नारायण पांडे, दिलीप सोनवळकर, श्रीमती संजीवनी जोगदंड यांना जिल्हाधिकारी जॉन्सन यांच्या हस्ते सन्मान पत्र देण्यात आले. निवासी उपजिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी सन्मान पत्राचे वाचन केले. तसेच उपस्थित सर्वांचे आभार मानले.

## चक्क हातपम्प घातला गटार कामात

### संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार : उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपालिकेचा गलथान कारभार. मागील चार वर्षांपासून नगरपालिके वर प्रशासक आहे. या काळात पालिका प्रशासनाने मनसोक्त हात साफ करून घेतला. राजीव गांधी चौकातुन शासकीय आयटीआय च्या मागील रस्त्यावर नव्याने रस्ता व नाली काम झाले. या मार्गावर असलेला हातपम्प (हापसा) बाजूला काढणे अपेक्षित होते. परंतु याचे गांभीर्य ना नगर पालिकेला ना संबंधित गुत्तेदाराला. चक्क हातपम्प गटार कामात घातला. संबंधित गुत्तेदार व त्यांची बिले काढणाऱ्या अधिकाऱ्यांचा सत्कार करणार असल्याचे शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी सांगितले.

गटाराच्या एकदम मधोमध हातपम्प असल्यामुळे एक बाजु पूर्णपणे कोंदली आहे. सुरळीत गटाराचे पाणी पुढे प्रवाहित होत नाही. ▶▶ उर्वरित पान २ वर



### संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांचे मानधन, स्वस्त धान्य आणि शिधापत्रिका प्रश्नी राजकिशोर मोदींचे तहसीलदारांना निवेदन

## सामान्याच्या विविध जनहितार्थ प्रश्नी आंदोलन छेडण्याचा राजकिशोर मोदींचा प्रशासनाला इशारा

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाई तालुक्यातील संजय गांधी निराधार, श्रावणबाळ योजनेच्या लाभार्थ्यांना मानधन द्यावे तसेच गोरगरिबांना स्वस्त धान्य आणि शिधापत्रिका देण्यात याव्यात या मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांनी आज बुधवारी तहसीलदार यांची भेट घेऊन विविध मागण्यांचे निवेदन दिले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रमुख नेते आणि



कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदनातील मुद्द्यांची सोडवणूक न झाल्यास जनहितार्थ आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा यावेळी राजकिशोर मोदी यांनी प्रशासनाला दिला. राजकिशोर मोदी यांच्यावतीने बुधवार दि २५ रोजी देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, गेल्या वर्षभरापासून वरील लाभार्थ्यांना त्यांचे पगार मिळत नाहीत. यामुळे लाभार्थी आपल्या कार्यालयाचे खेटे मारून त्रस्त झाले आहेत. या योजनेतील गोरगरीब तसेच वयोवृद्ध लाभार्थी आहेत. त्यांची शारिरीक आणि मानसिक स्थिती दुबळी झालेली असते, अशा ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिद्द,कष्ट,संघर्ष हेच यशाचे गमक: डॉ.लहाने




**माजलगाव । प्रतिनिधी**

कोणत्याही क्षेत्रात जायचे असेल तर विद्यार्थ्यांनी जिद्द,कष्ट,संघर्ष केल्याशिवाय यशाचे शिखर गाठता येणार नाही. तेच यशाचे गमक असल्याचे प्रतिपादन सुप्रसिद्ध प्लास्टिक सर्जरी डॉ. विठ्ठलराव लहाने यांनी ज्ञानवर्धिनी कोचिंग क्लासेस यांनी दि.२२/०६/२०२५ रविवार रोजी दुपारी ३:००वा. वैष्णवी मंगल ▶▶ उर्वरित पान २ वर

## बीड शहरात एकाच दिवशी दोन ठिकाणी चेन स्नॅचींग करणारे दोन आरोपी स्था.गु.शा. कडून जेरबंद

● **स्थानिक गुन्हे शाखा-बीड कामगिरी**

**बीड । प्रतिनिधी**

फिर्यादी नामे ज्योति विजय उदावंत रा.उमरखेड ता.महागाव जि.यवतमाळ यांनी पोलीस स्टेशन शिवाजी नगर येथे फिर्याद दिली होती की,दि.०७/०६/२०२५ रोजी फिर्यादी हया त्यांचे मुली सोबत नातवाचा साखरपुडा बीड येथे असल्याने त्यांचे भाऊ यांचे घरी आल्या होत्या.दि.०८/०६/२०२५ रोजी फिर्यादी व त्यांची मुलगी हया साखरपुडयाचे सामान खरेदी करण्यासाठी राजीव गांधी चौक येथे आल्या होत्या. दुपारी ०३.०० वा दरम्यान फिर्यादी या रिक्षा मध्ये बसत असताना फिर्यादी यांचे पाठी मागुन दोन अज्ञात ईसम मोटारसायकल वर बसुन ▶▶ उर्वरित पान २ वर





## भाजपाचे राजेंद्र साळुंके राष्ट्रवादीच्या वाटेवर

### अखेर माजी आमदार लक्ष्मण पवारांच्या बालेकिल्ल्याला अमरसिंह पंडित यांनी घेरले

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई शहरातील संजय नगर भागात रहिवासी असलेलें राजेंद्र शामराव साळुंके हे गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक व राजकीय वाटचालीस सक्रिय आहेत गेल्या अनेक वर्षापासून भाजपाचे माजी आमदार लक्ष्मण पवार यांच्या नेतृत्वाखाली काम करत असलेले विश्वासू समर्थक म्हणून ओळखले जाणारे राजेंद्र साळुंके हे राष्ट्रवादीच्या वाटेवर असल्याची



खात्रीलायक वृत्त मिळाले आहे.या प्रवेशाने माजी आमदार लक्ष्मणराव पवार यांना मोठा धक्का बसणार असून गेवराई शहरातील राजकीय समीकरण बदलणार आहे संजय नगर हा भाग माजी आमदार पवार यांचा बालेकिल्ला असल्याने या बालेकिल्लात माजी आमदार अम रसिंह पंडित यांनी डाव टाकल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्यात गेल्या पंचवीस वर्षात ▶▶ उर्वरित पान २ वर

## असोसिएशन ऑफ स्मॉल अॅंड मिडियम न्यूज पेपर ऑफ इंडिया च्या जिल्हाध्यक्ष पदी दिगंबर सोळंके यांची फेर निवड

**माजलगाव । प्रतिनिधी**

असोसिएशन ऑफ स्मॉल अॅड मिडीयम न्यूज पेपर ऑफ इंडिया या पत्रकार संघटनेच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी माजलगाव येथील लोक प्रचारक वृत्त पत्राचे संपादक दिगंबर सोळंके यांची फेर निवड करण्यात आली असल्याचे महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष प्रदीप कुलकर्णी यांनी जाहीर केले आहे.



राज्य कार्यकारिणी २०२५-२६च्या कार्यकारिणीत राज्य उपाध्यक्ष म्हणुन गोरख तावरे-कराड,जि.सातारा,भिका तुकडू चौधरी, जळगाव.राज्य सचिव सुभाष लहाने, बुलढाणा,संघटक-सुमित सुनीलराव कुलकर्णी, श्रीरामपूर, महिला आघाडी प्रमुख सौ तेजस्विनी सुर्यवंशी, सांगली,संघटन सचिव नेताजी मेश्राम, गडचिरोली, सहसचिव हेमंतू देसाई, धर्माबाद जि.नांदेड, संघटन सचिव भीमराव ऊल्हारे, अहिल्या नगर यांच्या निवड करण्यात आली आहे. तर राज्य कार्यकारिणी सदस्यचे म्हणुन सौ सुमन लक्ष्मण वाकडे, परळी वैद्यनाथ, भगवान नागोराव शहाणे, छत्रपती संभाजीनगर, रवींद्र वाघ, बुलढाणा,सौ शोभा जयपूरकर, नागपूर, ओम प्रकाश शिंदे, जालना. विभागीय अध्यक्ष- छत्रपती संभाजीनगर आत्मलिंग शेटे,परळी वैद्यनाथ, कोकण विभाग-अजित रामनाथ पाटील,उरण जि.रायगड, नागपूर मुकुंद जोशी, गडचिरोली, नाशिक -विलास कट्यारे, नाशिक, कोल्हापूर -सम्राट दिलीप सनगर, अमरावती -विजय देशमुख, अकोला, लातूर -विठ्ठलराव भानुदास राऊत यांची निवड करण्यात आली आहे. तसेच छत्रपती संभाजीनगर जिल्हाध्यक्ष पदी मंगलताई हिवाळे, जालना-अमित कुलकर्णी, बीड -दिगंबर माणिकराव सोळंके, हिंगोली -डॉ.प्रल्हाद शिंदे, नांदेड -म हेश्वरी कैलास गायकवाड,पुणे-म हेश आनंद लोंढे, सातारा-खंडू नागु इंगळे, सोलापूर -डॉ सिद्राम आप्पा येलगरे, नाशिक -नंदलाल जगताप, अहिल्या नगर -जितेंद्र पितळे, जळगाव -धनंजय किर्तने, नंदुरबार -चेतन सिंग राजपूत, ▶▶ उर्वरित पान २ वर

## आष्टी तालुक्यात जलजीवनचे काम न करणाऱ्या दोषी गुत्तेदारांवर होणार कारवाई

### जलजीवन मिशनच्या ५२ कामात गुत्तेदारांकडून दिरंगाई, १६ कामे अध्याप सुरुच नाहीत

● **या गावांमध्ये कामात दिरंगाई– नांदा,दैठणा,धिर्डी,केळसांगवी, क-हेवाडी,वाकी, पांगुळगव्हाण, मातावळी, हाजीपुर,करंजी, जळगांव, वनवेवाडी,कासारी, भाळवणी, शिराळ,डोईठाण, बिरंगळवाडी, पिंपळसुटी नांदा, निमगांवचोभा, देवीनिमगांव, महादेववाडी, कोल्हेवाडी, घाटापिंप्री,लमानतांडा(गहुखेल),चिंचेवाडी,गंगादेवी, खाकाळवाडी,बावी, कापशी, लाटेवाडी / महाजनवाडी, खलाटवाडी, नागतळा, मोराळा, लमानतांडा (मोराळा),वनवेवाडी (मोराळा), अरणविहीरा (डो),केळ,खडकवाडी, लमानतांडी,राळेसांगवी,शेडाळा, उंदरखेल, पुंडी (बो),धनगरवाडी (पिं), बोरोडी,माहिंदा,खुंटेफळ (पुं),भोजेवाडी, धनगरवाडी, पाटसरा,निमगांव**

● **या गावात अद्याप काम सुरू नाही – जल जीवन मिशन सुरू होऊन दोन वर्षाहून जास्त कालावधी लोटला असतानाही अद्याप हनुमंतगाव, लमानतांडा, बळेवाडी पारगाव, देवीनिमगाव, खुंटेफळ, मुर्शदपुर,अंभोरा, बीडसांगवी,बिरंगलवडी, जळगाव,राळेसांगवी, पिंपळगाव सुट्टी,कासारी,भोजेवाडी या गावांमध्ये जल जीवन मिशनचे कामे सुरू झालेली नाहीत.**

**कडा । प्रतिनिधी**

जनतेची तहान भागावी यासाठी ग्रामीण भागासह शहरी भागातही जलजीवन मिशन कार्यक्रम सुरू आहे. या योजनेअंतर्गत आष्टी तालुक्यात १७२ गावांमध्ये काम सुरू आहेत. या गावांपैकी १३ गावांमध्ये ही योजना पूर्णपणे राबवली जात आहे तर उर्वरित गावांमध्ये जुन्या योजना पुनर्जीवित करण्यात येत आहेत. परंतु या कामांमध्ये गुत्तेदारांकडून नियमांची पायमल्ली होताना दिसत आहे. काम सुरू न केलेल्या व काम ात दिरंगाई करणाऱ्या गुत्तेदारांवर प्रशासकीय कारवाई करण्यासाठी आष्टी ग्रामीण पाणीपुरवठ्याचे उप अभियंता यांनी ग्रामीण पाणी पुरवठा योजनेचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे अहवाल ▶▶ उर्वरित पान २ वर

● **गुत्तेदारांबरोबर दोषी अधिकाऱ्यांवरही कारवाई करा – आष्टी तालुक्यामध्ये जलजीवन मिशन कार्यक्रमांतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये गुत्तेदारांनी दिरंगाई केली आहे त्याचबरोबर काही गावांमध्ये अद्यापही कामे सुरू झालेली नाहीत.अशा गुत्तेदारांवर कारवाई करण्यासाठी उपअभियंता आष्टी यांनी कार्यकारी अभियंता यांना पत्र पाठवून कारवाई करण्याची मागणी केली आहे. संबंधित गुत्तेदारांवर कारवाई देखील होईल.परंतु यामध्ये गुत्तेदार जेवढे जबाबदार आहेत तेवढेच आष्टी ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे अधिकारीही जबाबदार आहेत. त्यामुळे या अधिकाऱ्यांची चौकशी होऊन त्यांच्यावरही कारवाई करण्यात यावी.**
**– कैलास दरेकर, शेतकरी सेना मनसे बीड जिल्हाध्यक्ष**

